नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०७/०४/२०२५ (सोमवार)**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द ४ गुन्हे नोंद
## ५ आरोपी अटक ,एकुण ९२ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त
## उपविभागिय पोलीस अधिकारी , कन्हान यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान**:— दिनांक ०७/०४/२०२५ रोजी श्री संतोष गायकवाड, उप विभागीय पोलीस अधीकारी कार्यालय कन्हान हे पोलीस स्टेशन कन्हान परीसरात अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे श्री संतोष गायकवाड यांनी त्यांच्या पथकांसह कन्हान पोलीस स्टेशन हद्दीतील ब्रुकबॉन्ड कंपनी, कन्हान समोर नाकाबंदी करून खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई क्रं १.** नमुद पथकाला नाकाबंदी दरम्यान १२:२० वाजता ट्रक क्र. एम. एच. ४० सी. एम. ९७९६ हा रामटेक कडून कामठी कडे येतांना दिसला त्यास थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **आरोपी नामे चंदन केशवरावजी मारबते, वय ३७ वर्षे , रा. वार्ड क्रं ३, वारेगाव ता कामठी जि नागपुर हा मिळुन आला. त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही वैध परवाना नव्हता. मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक मंगेश केने ,रा. कोराडी नाका ,नागपुर अशी** माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१) ८ ब्रास रेती किंमती ४०,००० /— रूपये आणि २) ट्रक क्र. एम एच ४० सी एम ९७९६ किंमती २०,००,०००/— रूपये असा एकुण २०,४०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं २.** नमुद पथकाला नाकाबंदी दरम्यान १२:४५ वाजता ट्रक क्र. एम एच ४० सी. टी. ७२४७ हा रामटेक कडून नागपूर कडे येंताना दिसला त्यास ब्रुकबॉन्ड कंपनीसमोर कन्हान

थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली . वाहन चालक **आरोपी नामे जयेश सुखदेव मते, वय २९ वर्षे रा. वार्ड क्रं ३ खरबी, ता. तुमसर जि. भंडारा हा मिळुन आला. त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही वैध परवाना नव्हता. मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक सुनिल चकोले रा. तुमसर जि. भंडारा अशी** माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) **८ ब्रास रेती किंमती ४०,००० /— रूपये आणि २) एम एच ४० सी.टी. ७२४७ किंमती २०,००,०००/— रूपये आणि ३) अँड्रॉईड मोबाईल फोन किंमती १०,००० /— रूपये असा एकुण २०,५०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं ३.** नमुद पथकाला नाकाबंदी दरम्यान १२:५५ वाजता ट्रक क्र. एम एच २७ बी. एक्स ३३४३ हा रामटेक कडून नागपूर कडे येंताना दिसला त्यास ब्रुकबॉन्ड कंपनीसमोर कन्हान थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली . वाहन चालक **आरोपी नामे सचिन मोतीराम मेश्राम, वय ३६ वर्षे आणि क्लिनर आरोपी नामे मिलींद अरूणजी उध्दार,वय ३२ वर्षे , दोघेही रा. वार्ड क्रं ३ ईसापुर, पोस्ट पिपळा, ता. सावनेर जि. नागपुर हे मिळुन आले. त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही वैध परवाना नव्हता. मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक आशिष जाधव , रा. कन्हान जि. नागपुर अशी** माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ८ ब्रास रेती किंमती ४०,००० /— रूपये आणि २) एम एच २७ बी.एक्स ३३४३ किंमती २०,००,०००/— रूपये आणि ३) २ अँड्रॉईड मोबाईल फोन किंमती १५,००० /— रूपये असा एकुण २०,५५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं ४.** नमुद पथकाला नाकाबंदी दरम्यान १३:२० वाजता ट्रक क्र. एम. एच. ४० सी. टी. ३५७८ हा रामटेक कडून नागपूर कडे येंताना दिसला त्यास थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये रेती आढळुन आली . वाहन चालक **आरोपी नामे पंकज प्रल्हाद भलावी, वय २५ वर्षे , रा. हनुमान वार्ड ,डोंगरला ता. तुमसर जि. भंडारा हा मिळुन आला. त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही वैध परवाना नव्हता. मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक मंगेश अंबादास राउत , रा. हनुमान वार्ड ,डोंगरला ता. तुमसर जि. भंडारा अशी** माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ८ ब्रास रेती किंमती ४०,००० /— रूपये आणि २) ट्रक क्र. एम एच ४० सी टी ३५७८ किंमती**

**३०,००,०००/— रूपये आणि ३) अॅड्रॉईड मोबाईल फोन किंमती १५,००० /— रूपये असा एकुण ३०,५५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**सदर कारवाईत एकुण ९२ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे कन्हान येथे कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम व कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम,१९५७ अन्वये ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. नमुद चालक आणि क्लिनर असे एकुण ५ आरोपीतांना अटक करण्यात आले आहे.**




## मोटर सायकल स्वार वृध्दास लुटमार करणाऱ्या ४ आरोपीतांना अटक
## मौदा पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ०१/०४/२०२५ रोजी पोलस स्टेशन मौदा येथे फिर्यादी नामे मारोती विश्वनाथ मोते, वय ७५ वर्षे, रा. मानेवाडा नागपुर यांनी पोलीस स्टेशनला येवुन तक्रार दिली की, दिनांक ३१/०३/२०२५ रोजी ते त्यांचे गुमथळा शेतशिवारातुन घरी नागपुर कडे स्वत:चे दुचाकीने जात असताना १७:३० वाजताच्या सुमारास गुमथळा ते नागपुर कडे जाणारे सर्विस रोडवर तीन अज्ञात मोटर सायकल स्वार आरोपीतांनी फिर्यादीची दुचाकी अडवुन

फिर्यादीला रोडवर खाली पाडुन त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने किंमती १,०२५,०००/— रूपये चा मुद्देमाल जबरीने हिसकावुन नेल्याचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मौदा येथे कलम ३०४ (२) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद आहे.

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री सारिन दुर्गे,प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन स्टेशन मौदा यांनी गुन्हा उघडकीस आणण्यासाठी गुन्हे शोध पथक ,पोलीस स्टेशन मौदा यांना आदेशीत केले. नमुद पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक पुराव्यावरून आरोपी **नामे १. बॉबी उर्फ अजुबा लहानु पात्रे, वय २९ वर्षे, २.क्रिष्णा विश्वनाथ लोढे, वय २५ वर्षे, ३.अमन रामु पात्रे , वय २६ वर्षे, तिघेही रा. विष्णु लक्ष्मी नगर, कन्हान ता कामठी** यांना ताब्यात घेवुन त्यांची विचारपुस केली असता त्यांनी तिघांनी मिळुन सदर गुन्हा केला असुन आरोपी क्र **४. विनोद रूपराव घोडमारे,वय ३५ वर्षे, रा.कढोली,ता कामठी** यांनी दिलेल्या माहीतीवरून फिर्यादीस लुटमार केल्याचे सांगितले. नमुद गुन्हयात वरील ४ आरोपीतांना अटक करण्यात आले आहे. गुन्हयातील जबरी चोरीने हिसकावुन नेलेले सोन्याचे दागिने आणि गुन्हा करण्यासाठी वापरलेली गाडी क्र एम एच ४०बि. टी. २५७० तसेच रोख रक्कम असा एकुण १,९८,०००/— रुपयांचा मुद्देमाल हस्त गत करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मौदा पोलीस करीत आहे.



## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, पारशिवणी पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— दिनांक ०५/०४/२०२५ रोजी पारशिवणी पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, नवेगाव खैरी पेंच नदी पात्रातुन अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी गेले असता तिथे महींद्रा ५७५ डीआाय कंपनीचा विना क्रमांकाचा ट्रॅक्टर व ट्रॉली मिळुन आले .वाहन **चालक आरोपी नामे** शुभम रामदासजी मिसार वय २४ वर्ष रा आवळेघाट ता पारशिवनी,याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलीसांनी **पंचासमक्ष १ ब्रास रेती किंमती ३००० /— रूपये, इतर साहीत्य किंमती २०० /— रूपये आणि महींद्रा ५७५ डीआाय कंपनीचा विना क्रमांकाचा ट्रॅक्टर व ट्रॉली किंमती ७,००,०००/— रूपये असा एकुण ७,०३,२०० /— रुपयांचा माल मुददेमाल जप्त केला आहे.**

**आरोपी नामे शुभम रामदासजी मिसार वय २४ वर्ष रा आवळेघाट ता पारशिवनी यांच्याविरूध्द पोस्टे पारशिवणी येथे कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, खापा पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन खापा** :— दिनांक ०६/०४/२०२५ रोजी खापा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, रिसाळा नाल्याचे पात्रातुन अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी गेले असता पोलसांना येताना पाहुन तेथील आरोपी पळुन गेले. घटनास्थळावर ट्रॅक्टर क्रमांक एम. पी. २८ झेड. सी. २०१५ व ट्रक्टरला जोडलेली ट्रॉली क्र एम पी २८ ए ए १२०७ मिळुन आले . पोलीसांनी **पंचासमक्ष १ ब्रास रेती किंमती ३००० /— रूपये,** ट्रॅक्टर क्रमांक एम. पी. २८ झेड. सी. २०१५ व ट्रक्टरला जोडलेली ट्रॉली क्रमांक एम. पी. २८ ए. ए.

१२०७ किंमती **५,००,०००/— रूपये असा एकुण ५,०३,०००/— रुपयांचा माल मुददेमाल जप्त केला आहे.**

ट्रॅक्टर क्रमांक एम. पी. २८ झेड. सी. २०१५ व ट्रक्टरला जोडलेली ट्रॉली क्र एम पी २८ ए ए १२०७ चा चालक मालक **यांच्याविरूध्द पोस्टे खापा येथे कलम ३०३(२),३(५) भा. न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ८ आरोपीतां विरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन रामटेक** अंतर्गत पोलीस पेट्रोलीग करीत असतांना त्यांना आरोपी नामे **१.** हिमांशु हरिष धमगाये, रा. आंबेडकर वार्ड, रामटेक हा मौजा कपुर बाहुली चांमुंडा माता मंदिर रामटेक परिसर येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला, आरोपी नामे **२.** दिपचंद रमेश राउत, रा. कामठी कालरी मडिबाग मंदिरच्या मागे,कन्हान पारशिवनी नागपुर ग्रामिण, **हा** रामटेक समोरील डांगरी रोडच्या बाजुला टाउन येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला, आरोपी नामे **३.** बादल सुदामाजी धुर्वे, वय २३ वर्षे, रा शांतीनाथ मंदिरच्या समोर रामटेक, हा पंचायत समितीच्या मागे, रामटेक येथेयेथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. आरोपी नामे **४.** पवन गुरूदेव धुर्वे वय ५३ वर्ष रा कवडक दुधाळा रामटेक हा पिंडकापार बस्टॉप जवळ रामटेक येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **५.** आशिष राजु झाडे वय २८ वर्ष रा कवडक दुधाळा ता रामटेक जि

नागपुर हा कपुर बाहुली मंदिर च्या मागे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन मौदा** अंतर्गत पोलीस पेट्रोलीग करीत असतांना पोलीसांना आरोपी नामे विशाल शिवशंकर धांडे वय ४४ वर्षे रा. गोपाल चौक मौदा हा स्नेहनगर मौदा येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन देवलापार** अंतर्गत पोलीस पेट्रोलीग करीत असतांना पोलीसांना आरोपी नामे अमीत गंगाधर ढोगे, वय २४ वर्षे, रा मन्सर सरकारी दवाखाना समोर ता.रामटेक जि.नागपुर हा मौजा पवनी  येथील चिंदाई माता मंदीराचे जवळ येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला

**पोलीस स्टेशन पारशिवणी** अंतर्गत पोलीस पेट्रोलीग करीत असतांना पोलीसांना आरोपी रोशन बंडुजी घारड, वय ३५ वर्षे, रा. नयाकुंड ता पारशिवनी हा मौजा नयाकुंडयेथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला

वरील नमुद ८ आरोपीतांवर नमुद पोलीस स्टेशनला कलम २७ गुंगीकारक औषधीदव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये ८ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**